महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
**क्रमांक :१६७४१/क-३ (लेखा)**

# ::परिपत्रक::

दिनांक : १२ नोव्हेंबर, २०२५

"क-१" शाखेचे परिपत्रक क्रमांक १६४३७/क-१, दिनांकित ०७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये नागपूर येथील राहणाऱ्या व्यवस्थेचे शुक्रवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत माहिती मागविण्यात आली आहे. नागपूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनासाठी विधानमंडळ सचिवालयातील जे अधिकारी व कर्मचारी अधिवेशनासाठी नागपूर येथे जाणार आहेत त्यांनी त्यांची नावे, पदनाम, मूळ वेतन, कार्यालय सोडण्याचा दिनांक इ. बाबतची माहिती मुद्दा क्रमांक (८) या सचिवालयातील प्रस्तुत परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व कक्षांनी त्यांच्या कक्षातून नागपूर येथे जाणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांची नावे "क-३" (लेखा) कक्षास लेखी स्वरुपात शुक्रवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी १:०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी. जे अधिकारी व कर्मचारी आपली माहिती वरील मुदतीत लेखा शाखेस देणार नाहीत अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना विलंबाने प्रवास अग्रिमाचे प्रदान झाल्यास त्याची जबाबदारी लेखा शाखेची राहणार नाही.

शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३ प्र.क्र.३०/२०१३/ विनियम भाग-२, दि.१७/०४/२०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग-एक अ.क्र.१६, नियम क्र.१४२-क च्या अट ४. नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासुन ३ महिन्याच्या आत त्याचे समायोजन करण्यात आले पाहिजे त्यानुसार सचिवालयातील ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रवास अग्रिम देण्यांत आला आहे. त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रवासाचा तपशिल ३१ जानेवारी २०२६ पर्यंत लेखा शाखेस सादर करावा. अन्यथा त्यांच्या अग्रिमाचे समायोजन होणार नाही त्याची सर्वस्व जबाबदारी संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांची राहील.

**(स्वाती ताडफळे)**
उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

२) मा.सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

३) मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

४) मा.उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.

५) सचिव (१), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) सचिव (२), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

७) सचिव (३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

८) सचिव (४), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

९) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

११) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१३) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१४) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१५) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१६) निवडसूची.